# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १३/०१/२०२६
## पोलीस अंमलदाराने विहीरीत उडी घेतलेल्या शेतकऱ्याचे वाचविले प्राण

दिनांक १२/०१/२०२६ रोजी दुपारी १२/०० वाजेच्या सुमारास काटोल पोलीस हे तहसीलदार काटोल यांचे आदेशाने संबधीत कार्यालय उपविभागीय अभियंता जि.प. बांधकाम विभाग काटोल, उपअधिक्षक भुमी अभिलेख, काटोल, सचिव ग्राम पंचायत खानगाव, पोलीस स्टेशन काटोल येथील संबधीत अधिकारी व कर्मचारी यांचे मदतीने मौजा खानगाव शिवारातील शेत सर्वे क्रं. १४४/२ वरील पांदन रस्त्यावरील अतीक्रमण काढणेकरीता सिंमाकन करण्याची कार्यवाही करत असतांना शेत सर्वे क्रं. १३५ क्षेत्र ०.७७ हे. आर. चे सामायीक खातेदारा पैकी श्री. अरूण रामप्रसाद चिंचोरीया रा. खानगाव यांने विहरी जवळील शेत सिंमाकन करीत असतांना अरूण चिंचोरिया याने अडथळा निर्माण केला. त्यानंतर जेसीबीचे साहाय्याने रस्त्यामध्ये येणारे झाडे तोडत असतांना जेसीबी समोर जावून जेसीबी पुढे जावू नये म्हणून अडथळा निर्माण केला तसेच तुम्ही सिंमाकन तात्काळ थांबवा असे म्हणून शासकीय कामात अडथळा निर्माण करीत स्वत:चे शेतातील विहरीमध्ये उडी मारली.

**त्यावेळी तिथे पोलीस निरीक्षक श्री रंजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी काटोल यांच्यासह काटोल पोलीस स्टेशनचा स्टाफ हजर होता. तिथे हजर असलेले पोलीस अंमलदार प्रमोद कोहळे ब.नं ४०५ यांनी तात्काळ कोणतीही पर्वा न करता विहीरीत उडी घेत अरूण चिंचोरिया यांचे प्राण वाचविले.** मा.श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी प्रमोद कोहळे यांचे कौतुक केले.

तरुण भारत
Nagpur Pages | 2026-01-14 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# हवालदारामुळे शेतकऱ्याला मिळाले जीवदान

## प्रमोद कोहळे यांची कौतुकास्पद कामगिरी

**नागपूर** : खानगाव भागातील शेतांचे सीमांकन आखत असताना एका शेतकऱ्याला त्याला विरोध केला. यावेळी उपस्थित सरकारी अधिकाऱ्यांनी व पोलिसांनी त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला. पण त्याने न ऐकता थेट विहिरीत उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. अशावेळी हवालदार प्रमोद कोहळे यांनी स्वत:च्या जीवाचा विचार न करता उडी घेत आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या अरुण चिंचोरिया याला वाचविले. हा सर्व प्रकार काटोल तालुक्यातील खानगावात १२ जानेवारी २०२६ रोजी घडला.

तहसीलदारांनी दिलेल्या आदेशानुसार जि.प.बांधकाम विभागातील उप विभागीय अभियंता, भूमी अभिलेखचे अधिकारी, सचिव तथा कर्मचारी खानगाव शिवारातील शेत सर्वे क्रमांक १४४/२ वरील पांदण रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी सीमांकन करीत होते. तेव्हाच शेत सर्वे क्रमांक १३५ मधील खातेदार अरुण रामप्रसाद चिंचोरीया यांनी शासकीय कार्यात अडथळा आणला. त्यांना सर्वांनी बाजूला होण्याची विनंती केली. पण ते ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. अशावेळी त्यांनी स्वत:चा विचार न करता आपल्याच शेतातील विहिरीत आत्महत्येसाठी उडी घेतली. त्यावेळी ठाणेदार रंजित शिरसाठ आणि कर्मचारी उपस्थित होते. त्याचवेळी प्रमोद कोहळे यांनी धाडस करीत अरुण चिंचोरीया यांच्याकरिता उडी घेत त्यांना सुखरूप बाहेर काढले. याप्रकरणी पोलिसांनी शासकीय कार्यात अडथळा आणला म्हणून अरुण चिंचोरीया यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. या कृतीबद्दल माजी सैनिक संघटना काटोलतर्फे रत्नाकर ठाकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

*(तभा वृत्तसेवा)*

### सैन्यातील शिक्षण कामास पडले



मी पोलिस खात्यात येण्यापूर्वी सैन्यात कार्यरत होतो. तिथे आम्हाला जी शिकवण दिली, त्याचीच मला त्यावेळी आठवण आली अन् क्षणाचाही विचार न करता शेतकऱ्याला वाचविण्यासाठी उडी घेतली. शेवटी शेतकरीच हाच आपल्या देशाचा अन्नदाता आहे. त्या शेतकऱ्याचा जीव वाचला याचा मला आनंद असल्याची भूमिका धाडसी कृती करणाऱ्या प्रमोद कोहळे यांनी मांडली.

# खाकीच्या धाडसाने शेतकऱ्याला जीवदान

## अतिक्रमण काढताना विहिरीत घेतली उडी



**काटोल, तालुका प्रतिनिधी.** शासकीय कामात अडथळा, तणावपूर्ण वातावरण आणि अचानक मृत्यूच्या दाढेत गेलेला एक शेतकरी पण त्या क्षणी खाकीतील माणुसकी पुढे आली आणि एक जीव वाचला. सोमवारी (दि.१२) दुपारी खानगाव शिवारात पांदण रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरू असताना अचानक परिस्थिती हाताबाहेर गेली. सिंमाकन प्रक्रियेला विरोध करत शेतकरी अरूण चिंचोरीया यांनी थेट शेतातील विहिरीत उडी मारली. काही क्षणांतच परिसरात एकच गोंधळ उडाला.

### शासकीय कामात अडथळा, गुन्हा दाखल

शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी संबंधित शेतकऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी त्या दिवशी खानगावमध्ये कायद्यापेक्षा मोठी ठरली ती एका माणसाची दुसऱ्या माणसासाठी झेप.

'आता काही तरी अनर्थ होणार' अशी भीती उपस्थितांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. मात्र त्या क्षणी कोणतीही भीती न बाळगता पोलिस अंमलदार प्रमोद कोहळे यांनी क्षणाचाही विलंब न करता विहिरीत उडी घेतली. जीवाची पर्वा न करता त्यांनी शेतकऱ्याला घट्ट पकडले आणि सुरक्षित बाहेर काढले. काही क्षणांपूर्वी मृत्यू समोर दिसत असलेला अरूण चिंचोरीया पुन्हा श्वास घेत होता. या थरारक घटनेनंतर उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला. खाकीतील केवळ कर्तव्य नाही, तर माणुसकी किती जिवंत आहे याचे हे जिवंत उदाहरण ठरले.